**नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापेनवरील विविध तांत्रिक संवर्गातील अधिकाऱ्यांची बदलीने पदस्थापना करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**शासन निर्णय क्र.बदली-५८१५/१५४५/प्र.क्र.२७३/नवि-२७,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २२ जानेवारी, २०१६.

<u>वाचा :-</u> १.संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.आस्था/मुदतपूर्व बदल्या/प्रशा-१/७९, दि.०६.१०.२०१५.
२. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.आस्था/रासेरा/नर/प्रशा-१/८०, दि.०६.१०.२०१५.
३. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.आस्था/मुदतपूर्व बदल्या/प्रशा-१/६८०५, दि.२९.१०.२०१५.

**<u>प्रस्तावना :-</u>**

नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील जे अधिकारी पदस्थापनेकरिता प्रतिक्षेत होते व प्रशासकीय कारणास्तव ज्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करणे आवश्यक आहे, त्या अधिकाऱ्यांना बदलीने पदस्थापना देण्याबाबत संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भाधीन पत्रान्वये प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर केलेले आहेत.

**०२.** संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त प्रस्ताव विचारात घेता, पदस्थापनेकरिता प्रतिक्षेत असलेल्या व प्रशासकीय कारणास्तव बदली करावयाच्या अधिकाऱ्यांना बदलीने पदस्थापना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे शासन आदेश देण्यात येत आहेत :-

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) (दोन) व कलम ४ (५) मधील तरतुदींनुसार प्रशासकीय कारणास्तव नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापेनवरील अधिकाऱ्यांच्या त्यांच्या नांवासमोर दर्शविण्यात आलेल्या खालील विवरणपत्रातील **स्तंभ-५** मधील कार्यालयात प्रशासकीय कारणास्तव बदलीने पदस्थापना करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नांव | पदनाम | सध्याची पदस्थापना | बदलीने पदस्थापनेचे कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. सं. वि. पवार | नगर रचनाकार | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत | नगर रचनाकार, मूल्यांकन तज्ञ, अकोला. |
| २ | श्री. दि. स. चव्हाण | नगर रचनाकार | सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका (रुजू झाले नाहीत) | नगर रचनाकार, सातारा नगरपरिषद, सातारा (शा. आ.) (श्री. प्र. व. राजे यांचेऐवजी) |
| ३ | श्री. प्र. व. राजे | नगर रचनाकार | नगर रचनाकार, सातारा नगरपरिषद, सातारा. | नगर रचनाकार, इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. (श्री. दि. स. चव्हाण यांच्या बदलीने रिक्त झालेल्या पदावर) |
| ४ | श्री. सं. वि. कांबळे | नगर रचनाकार | भूमि संपादन, विशेष अधिकारी, विशेष घटक क्र.२, पिंपरी. (दि.१३.०८.२०१३ पासून) | नगर रचनाकार, बारामती शाखा, बारामती, जि. पुणे (रिक्त पदी) |
| ५ | श्री. रा. से. राऊत | नगर रचनाकार | पदस्थापनेकरिता प्रतिक्षेत | नगर रचनाकार, सह संचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर. (रिक्त पदी) |
| ६ | श्री. दे. रा. खोत | सहाय्यक नगर रचनाकार | नगर रचनाकार, विकास योजना, विशेष घटक, वाशिम. | कार्यकारी अभियंता, अमंलबजावणी कक्ष, नगर रचना, नागपूर. |

**०२.** संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वरील अधिकाऱ्यांना बदलीने पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्याकरिता आवश्यक ते कार्यकारी आदेश तातडीने निर्गमित करण्याची कार्यवाही करावी.

**०३.** सदरहू आदेशान्वये बदलीने पदस्थापना करण्यात येत असलेल्या अधिकाऱ्यांना अनुज्ञेय असल्यास पदग्रहण अवधी व संयुक्त बदली अनुदान मंजूर करण्यात यावे.

**०४.** सदरहू आदेशान्वये पदस्थापना करण्यात येत असलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू होणे आवश्यक आहे. पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न झाल्यास किंवा राजकीय दबाव आणून पदस्थानेत बदल करण्याचा प्रयत्न केल्यास, संबंधित अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालात त्याबाबतची नोंद घेण्यात यावी. तसेच राजकीय दबावाची कृती ही महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३ (तीन) व नियम २३ चा भंग करणारी असल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध उक्त नियमाखाली शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.

**०५.** या आदेशान्वये बदलीने पदस्थापना करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त करण्यात आले व ते पदस्थापनेच्या ठिकाणी कोणत्या दिनांकास हजर झाले, याबाबतची माहिती शासनास त्वरित अवगत करण्यात यावी.

**०६.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेताक **२०१६०१२२१०३५४८७९२५** असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dilip Sitaram Anerao

Digitally signed by Dilip Sitaram Anerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=26293749901b04ac59c3d853c2fdc32df6083d811902b3e94b40b924fa028887, cn=Dilip Sitaram Anerao
Date: 2016.01.30 17:17:49 +05'30'

**(दि. सि. अणेराव)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत :-**

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर.
२. मा. मुख्य मंत्र्याचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. आयुक्त, सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका, सांगली.
४. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१. **(३-प्रती)**
५. सह संचालक, नगर रचना, अमरावती, नागपूर व पुणे.
६. कार्यकारी अधियंता, अमंलबजावणी कक्ष, नागपूर.
७. मुख्याधिकारी, वाशिम नगरपरिषद, वाशिम.
८. मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद,सातारा.
९. मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.
१०. भूमि संपादन, विशेष अधिकारी, विशेष घटक क्र.२, पिंपरी, पुणे.
११. नगर रचनाकार, विकास योजना, विशेष घटक, वाशिम नगरपरिषद, वाशिम.
१२. नगर रचनाकार, बारामती शाखा, बारामती, ता. बारामती, जि. पुणे.
१३. मा. राज्यमंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१४. प्रधान सचिव (नवि-१) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. सर्व संबंधित अधिकारी-------------------------------------------------, यांना **(संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत)**
१६. निवडनस्ती / नवि-२७.

****